सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ३ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# दिल्लीत अग्नितांडव; २१ जणांचा होरपळून मृत्यू, जीव वाचवण्यासाठी आटापिटा, इमारतीवरून मारल्या उड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नवी दिल्ली** राजधानी दिल्ली येथील मालवीय नगरमध्ये भीषण आगीची भीषण समोर आली आहे. एका हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत आत्तापर्यंत होरपळून २१ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीतील लेमन ग्रीन नावाच्या रेस्टॉरंटमध्ये आज (बुधवार, ता ३) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. याबाबत माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवा ने घटनास्थळी धाव घेतली, त्यानंतर येथील इमारतीमधून ३७ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. मात्र, या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना सध्या जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर या घटनेचे अनेक फोटो व्हिडीओ समोर आले आहेत.या आगीच्या घटनेबाबत माहिती देताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, इमारतीत आग वेगाने पसरल्यानंतर बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी इमारती समोरील जमिनीवर गाद्या टाकून बचावाची व्यवस्था केली.



त्यानंतर अनेकांनी जीव वाचवण्यासाठी बाल्कनी, खिडक्या आणि इमारतीच्यावर च्या मजल्यांवरून खाली उड्या मारल्या. दरम्यान, निवासी भागांमध्ये किती हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना व्यवसायासाठी परवाना देण्यात आला आहे, याबाबतची माहिती महानगर पालिका प्रशासनाकडे मागवण्यात आली आहे. तसेच अशा सर्व आस्थापनांची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



## मालवीय नगरमध्ये आग कशी लागली?

दिल्लीतील मालवीय नगर येथील रेस्टॉरंटला लागलेल्या भीषण आगीत २१ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेबाबत माहिती देताना मालवीय नगर विधानसभा मतदारसंघाचे माजी आम आदमी पक्षाचे आमदार सोमनाथ भारती यांनी सांगितले की, शुक्रवारी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. त्यांच्या माहितीनुसार, आग प्रथम रेस्टॉरंटच्या स्वयंपाकघरात लागली आणि त्यानंतर ती शेजारील हॉटेलच्या वरच्या मजल्यांपर्यंत वेगाने पसरली. आग आणि धुरामुळे अनेक जण प्रभावित झाले. घटनास्थळी बचावकार्य सुरू असून आपणही या बचाव मोहिमेत सहभागी असल्याचे भारती यांनी सांगितले. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना दिल्ली सरकारने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करून आगीमागील नेमके कारण आणि जबाबदार घटकांचा शोध घेण्यात यावा, असेही त्यांनी म्हटले.

# विधान परिषद निवडणुकीत करावा लागणार विशिष्ट रंगाच्या पेनाचा वापर

## १ चा आकडा न लिहिल्यास मत ठरणार अवैध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. विधान परिषदेच्या स्थानिक मतदार संघाच्या १७ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. यात नागपुरची पोटनिवडणूक आहे. या निवडणुकीतही नाराजीनाट्य बघायला मिळत असून बंडखोरी झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे बंडखोरांना शांत करण्यासाठी पक्षश्रेष्ठींचे प्रयत्न सुरू आहेत.उमदेवारी अर्ज मागे घेण्यासाठी ४ जून ही अंतिम तारीख आहे. त्यामुळे यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. परंतु आतापासून विजयाचा आकडा जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यासाठी मतदारांची पळवापळवी सुरू झाली असून घोडाबाजारही सुरू झाल्याचा आरोप होत आहे.

**ईव्हीएमवर नाही मतपत्रिकेवर होणार निवडणूक**

ही निवडणूक ईव्हीएमवर होणार नसून मतपत्रिकेवर होणार आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराला एक मतपत्रिका मिळणार आहे. निवडणूक आयोगांने मतदानासंदर्भात काही प्रक्रिया निश्चित केली आहे. त्यानुसार मतपत्रिकेत उमेदवारांची नावे असतील. पसंतीच्या उमेदवाराची निवड करावी लागणार आहे. पसंतीच्या नावासमोर मतदारास १ क्रमांक लिहावा लागणार आहे.



निवडणुकीत जेवढे उमेदवार रिंगणात आहे. त्या प्रत्यकाला मत देता येणार आहे.

एका पेक्षा जास्त उमेदवारास मत द्यायचे असल्यास २, ३, ४ असा क्रमांक द्यावा लागेल. क्रमांक १ न लिहिता इतर क्रमांक लिहिल्यास संबंधित मत अवैध ठवण्यात येईल. १ आकडा एकापेक्षा जास्त उमेदवारांच्या समोर लिहिला असेल तरी संबंधित मत अवैध ठरेल. दोन उमेदवारांच्या दरम्यान हा आकडा लिहिल्यासहीत मत अवैध ठरेल. पसंतीक्रम आकड्यांऐवजी शब्दात लिहिला तरी मत अवैध ठरवण्यात येईल. नावासमोर इतर कोणत्याही प्रकारच्या चिन्हाचा वापर करता येणार नाही. त्याच प्रमाणे विशिष्ट उमेदवाराला मत केल्याचे स्पष्ट होईल, अशा चिन्हाचा वापर केल्यासही मत अवैध ठरेल. त्यामुळे ते मत वाया जाईल.

**या रंगाच्या पेनाच वापर बंधनकारक**

या निवडणुकीत मतदान करताना निवडणूक आयोगाकडून विशिष्ट रंगाचा पेन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मतदानासाठी जांभळ्या रंगाच्या स्केच पेनचा वापर करावा लागणार आहे. इतर कोणत्याही रंगाच्या पेनाच्या वापर करता येणार नाही. पेन्सिल किंवा बॉलपेनचा वापर केल्यास मत अवैध ठरण्यात येईल. उमेदवाराच्या नावासमोर बोटाचा ठसा उमटवल्यासही मत अवैध ठरणार आहे.१८ जून रोजी या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. तर २२ जूनला मोजणी होईल.

अमरावती विधान परिषद निवडणुकीत नवा निर्णायक टप्पा

# विप्लव बाजोरिया यांना नागपूर उच्च न्यायालयातूनही दिलासा नाही

## नामांकन रद्द करण्याचा निर्णय कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नागपूर–** अमरावती विधान परिषद निवडणुकीत आणखी एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून अपक्ष उमेदवार विप्लव बाजोरिया यांना नागपूर खंडपीठातूनही कोणताही दिलासा मिळालेला नाही. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचे नामांकन अर्ज रद्द केल्यानंतर त्या निर्णयाविरोधात बाजोरिया यांनी नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने सुनावणीनंतर ही याचिका फेटाळून लावत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य असल्याचे स्पष्ट केले.बाजोरिया यांच्या वतीने ॲड. रेणुका शिरपूरकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. दरम्यान, इतर तीन उमेदवारांच्या वतीनेही ‘कॅव्हेट’ दाखल करण्यात आले होते. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती प्रफुल्ल कुंभलकर यांनी अमरावती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय कायदेशीरदृष्ट्या योग्य असल्याचे नमूद करत बाजोरिया यांची याचिका नामंजूर केली.भाजपचे उमेदवार तथा माजी मंत्री प्रवीण पोटे यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुनील मनोहर यांनी प्रभावी बाजू मांडली. त्यांना ॲड. प्रशांत देशपांडे, ॲड. चंद्रकांत गोरले, ॲड. संदीप गुप्ता, ॲड. रोहित उपाध्याय आणि ॲड. सुमित शर्मा यांनी सहकार्य केले.तर काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांच्या वतीने ॲड. भांगडे यांनी युक्तिवाद केला. तसेच अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले यांच्या वतीने ॲड. ऋषिकेश मार्डीकर यांनी न्यायालयात भूमिका मांडली.नामांकन रद्द करण्याचा निर्णय कायम असल्याचा निर्णयानंतर बाजोरिया पिता पुत्र तातडीने दिल्ली कडे रवाना झाले आहेत.ते आता सर्वोच्च न्यायालयात धाव घेणार असल्याची माहिती आहे.





# विधान परिषद निवडणूक: बाजोरिया पिता-पुत्राविरोधात गुन्हा दाखल

## जिल्हाधिकाऱ्यांसोबत असभ्य वर्तन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

निवडणूक अर्ज छाननी व आक्षेपावरील सुनावणीदरम्यान विप्लव बाजोरिया यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांच्याशीच असभ्य वर्तन केले. बाजोरिया यांचा जिल्हाधिकाऱ्यांशी बोलण्याचा भाव हा त्यांच्यावर दबाव टाकणारा तसेच धमकी वजा शिविगाळ स्वरूपातील होता. यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी बाजोरिया यांच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा टाकण्यासंबंधीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या तक्रारीच्या आधारे मंगळवारी



रात्री १ वाजता माजी आमदार विप्लव बाजोरिया, त्याचे वडील माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया आणि इतर काही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.उमेदवारी अर्जावरील वाद आधीच चर्चेत असताना आता बाजोरिया पिता-पुत्रावर गुन्हा दाखल झाल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

### हो, हा गुन्हा मी केला : बाजोरिया

निवडणूक अर्जावर निकाल देण्याचा अधिकार जसा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा आहे, तसाच या निकालाची प्रत मागण्याचा अधिकारही माझा आहे. या निर्णयाला मला उच्च न्यायालयात आव्हान द्यायचे आहे. मला अजूनही निकालाची प्रत मिळालेली नाही. निकालाची प्रत मागणे गुन्हा असेल तर तो गुन्हा मी केला आहे, असे विप्लव व गोपीकिशन बाजोरिया यांनी सांगितले.

# महायुतीच्या अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर

## बंडखोरी करत अर्ज दाखल करणाऱ्यांनी माघार घ्यावी, रवींद्र चव्हाण यांची विनंती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**महाराष्ट्रात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये अनेक ठिकाणी बंडखोरी झाल्याचे पाहायला मिळाले आहे. मात्र, असे असूनही महायुती म्हणून आम्ही एकत्र निवडणूक लढवू आणि जास्तीत जास्त जागा जिंकू असे महायुतीच्या नेत्यांकडून सांगण्यात येत आहे. या संपूर्ण पार्श्वभूमीवर महायुतीने संयुक्त पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना रवींद्र चव्हाण म्हणाले, आपल्या सर्वांना माहीत आहे विधान परिषदेच्या निवडणुका ज्या १८ तारखेला होऊ घातलेल्या आहेत, त्यात एक पोटनिवडणूक आहे, जी नागपूरची आहे. आणि १६ विधानपरिषदेच्या असणाऱ्या या निवडणुका आणि या निवडणुकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रात एनडीएचे सरकार अतिशय चांगल्या पध्दतीने काम करताना दिसत आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्याचसोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई. या तिघांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचे सरकार हे अतिशय चांगल्या पद्धतीने शेतकरी, कष्टकरी आणि या सगळ्यांसाठी हितावह असल्याचे निर्णय हे घेताना दिसत आहे.

# राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांवर लादले कडक नियम

## जेवणासाठी घरी जाण्यास मनाई, परदेश दौऱ्यावरही बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ मुंबइ** – राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांवर नवीन नियम लादले आहेत. कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत परदेश प्रवासावर बंदी घालण्यात आली आहे. यासह कर्मचाऱ्यांना जेवणासाठी घरी जाण्यास मनाईही करण्यात आली आहे. पुदुचेरी सरकारनं राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांवर हे निर्बंध लादले आहेत. इंधन, वीज आणि संसाधनांचा योग्य आणि बचत व्हावी यासाठी राज्य सरकारनं नवीन नियम लागू केलेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इंधन संकटापासून वाचवण्यासाठी आणि परकीय चलन बचत करण्यासाठी देशातील नागरिकांना आवाहन केलंय. त्याच पार्श्वभूमीवर पुदुचेरी येथील सरकारनं कर्मचाऱ्यांसाठी नवीन नियम लागू केले आहेत. पुदुचेरीचे कामगार आणि प्रशासनिक सुधार विभागाचे अवर सचिव एस. मुरुगेसन यांनी सर्व शासकीय विभागांना, कार्यालयांना, सार्वजनिक क्षेत्राच्या उपक्रमांना आणि स्वायत्त संस्थांना एक परिपत्रक पाठवले आहे.

या परिपत्रकानुसार, पंतप्रधान मोदींच्या इंधन बचत करण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत सरकारनं हा निर्णय घेतला. पंतप्रधानांनी देशवाशियांना केलेल्या आवाहनानंतर मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढवा बैठकीत कर्मचाऱ्यांबाबत नियम लागू करण्यात आलेत.

दुपारी जेवणाच्या वेळेत विनाकारण कर्मचाऱ्यांना कार्यालयाच्या बाहेर जाऊ नये. कर्मचाऱ्यांनी कार्यालयातच जेवण करावे. अवर सचिव एस. मुरुगेसन यांनी सांगितलं की, सर्व शासकीय विभागीय सचिवांना आणि प्रमुखांना आपल्या कार्यालयात नियमांचे काटेकोरपणे पालन करावे अशा सूचना दिल्या आहेत.

**सार्वजनिक वाहनांचा वापर करा–** परिपत्रकानुसार सरकारी अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांनी कामांसाठी सार्वजनिक वाहनांचा वापर करावा.

यासह सरकारनं विजेची बचत करण्याचे आवाहन कर्मचाऱ्यांना केले आहे. कार्यालयात ज्या इलेक्ट्रिक वस्तूंची गरज नाही म्हणजेच लाईट, एअर कंडीशनर आणि कॉम्प्युटर आदी इलेक्ट्रिक साधनाचा वापर करायचा नसेल ते बंद करावीत.

### आवश्यक नसलेले दौऱ्यांवर बंदी

सरकारकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार आवश्यक नसलेल्या परदेश दौऱ्यावर, अभ्यास दौरे आणि सल्लामसलतीचे दौरे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी स्थगित करावेत. यासह इंधनावरील खर्च कमी करण्यासाठी शासकीय वाहनांचा विवेकपूर्ण वापर करण्याचे आणि 'वाहन पूलिंग' प्रणालीचा अवलंब करण्याचे निर्देश परिपत्रकात देण्यात आलेत. अधिकाऱ्यांना अनावश्यक शासकीय प्रवास टाळण्याचा आणि शक्य असेल तेव्हा आंतरविभागीय बैठका, आढावा सत्रे व समन्वय बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घ्याव्यात असा सल्लाही सरकारच्या परिपत्रकात देण्यात आलेत.

# संपादकीय ......

## विधान परिषदेचे महाभारत

*विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने महायुती आणि महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उघड झाले आहेत. उमेदवारी, सत्ता समीकरणे आणि पैशाच्या प्रभावाभोवती फिरणारे हे राजकारण लोकशाही प्रक्रियेपुढील गंभीर प्रश्नही अधोरेखित करते.*

*विधान परिषदेचे उमेदवार अखेर ठरले. पण ठरलेले उमेदवार आपल्याला मान्य नसल्याचा इशारा एकमेकांसमवेत राजशकट हाकणाऱ्या सत्ताधारी पक्षातील दोन्ही प्रमुख पक्षांनी दिला. सत्तेसाठी एकत्र आलेली ही मंडळी आहेत. सत्तेची पालखी वाहण्यासाठी भोई झालेल्या या पक्षांचे परस्परांशी पटेनासे झाले आहे. ते लपून राहिले नव्हतेच. विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने ते समोर आले. रुसवे-फुगवे दूर व्हावेत यासाठीच्या समजुती, हेच काय ते काम सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू आहे, असे वाटेल. उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत हेच सुरू राहील. 'तुझी माझी धाव आहे युतीपासून युतीकडे' असे म्हणायचे आणि प्रत्यक्षात परस्परांच्या पाठीत खंजीर खुपसायचा प्रयत्न करायचा हा महाराष्ट्राच्या विद्यमान राजकारणाचा स्थायी भाव झाला आहे.*

*फितुरी हे महाराष्ट्राच्या इतिहासाचा आढावा घेतला तर समोर येणारे लक्षण दिसेल. नेत्यांच्या महत्त्वाकांक्षा कमालीच्या वाढल्यामुळे कोणीच कोणासाठी थांबायला तयार नाही. प्रत्येकालाच मोठे व्हायचे आहे. महाराष्ट्रात सध्या ठिकठिकाणी जो खेळखंडोबा दिसतो आहे तो याच वृत्तीचा परिचायक आहे. आठवडाभर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री चर्चा करत होते. या चर्चेचे ठिकाण थेट दिल्लीपर्यंत गेले. त्यामुळे या निवडणुका भलत्याच लक्षवेधी झाल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महत्त्वाचे नेते असल्याने केंद्रातील भाजपचे अध्वर्यू त्यांना वेळ तर देतात; पण अंतिमत: स्वतःच्या पक्षाला सोयीचे असेल तेच करतात, हेही या निमित्ताने पुढे आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सल्लामसलत करून उमेदवार ठरवा, असे दिल्लीला शिंदे यांना सांगितले गेले असे म्हणतात. शिंदेंना कार्यकर्त्यांना न्याय द्यायचा असल्याने आणि पुढच्या निवडणुकीत भाजपने स्वबळाचा नारा खरा करून दाखवला तर पर्यायी सैन्य तयार ठेवायचे असल्याने जेथे जेथे बंडखोरी होईल तेथे ती महत्त्वाची असेल तर सध्या कानाडोळा करायचा ठरवलेले दिसते. अंतिमत: सरकार एक आहे आणि कारभार एकत्र करायचा असल्यामुळे बंडोबा थंडोबा होतीलही; पण विरोधी पक्ष सक्रिय नसताना सत्ताधारीच एकमेकांशी वाद घालून विरोधकांची जागा भरून काढत असल्याचे विदारक चित्र समोर आले.*


*राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात एकवाक्यता राहिलेली नाही. पक्षातला वाद विकोपाला गेल्याचे चित्र दोन दिवस निर्माण झाले. पुणे हा मतदारसंघ भाजपने उदार मनाने राष्ट्रवादीला देऊन टाकला, हा शिवसेना शिंदे गटाचा आक्षेप. मात्र नशिबाने पुणे मतदारसंघ हाती आला तरी वाद टाळता आले नाहीत आणि एकाच पक्षाचे दोघे दोघे उमेदवारी अर्ज दाखल करायला निवडणूक कार्यालयात पोहोचले. खरे तर पक्षाची यात शोभा झाली. आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार या दोघांनीही सुनील टिंगरे यांची समजूत घातली आहे आणि धनदांडगेपणाचा आरोप ज्या पिता-पुत्रांवर झाला त्यातील चिरंजीव विक्रम काकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार आहेत.निवडणुकीतील माघारीनंतर परिस्थिती काय होईल ते समजायला दोन दिवस वाट पाहावी लागेल. मात्र त्यानंतरही विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने चिंताजनक चित्र समोर येते आहे. या परिस्थितीचा विचार करावा लागणार आहे. या निवडणुकांसाठी रिंगणात कोण कायम राहणार हे ठरल्यानंतर ही मंडळी पुढे नेमके काय करणार हा विषय चर्चेला येईल. एका विषयावर चर्चा व्हायला हवी. ती म्हणजे विधान परिषद निवडणुकांसाठी खर्च होणारा पैसा आणि प्रत्यक्षात उतरणाऱ्या कोट्यवधीत मोडणाऱ्या घडामोडी. यावेळी महायुतीकडे १७ ही ठिकाणी ते स्वतःच्या बळावर निवडून येतील एवढे बहुमत आहे. मात्र तरीही कोट्यवधी खर्च होणार आहेत.*

*पक्षचिन्हावर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनाही निवडणूक जिंकण्यासाठी लक्ष्मीचे दर्शन करून द्यावे लागेल म्हणतात! या विधान परिषद निवडणूक निमित्ताने आठवडाभर खेळ झाला, तो देखील सत्ताधारी पक्षांमध्ये स्वतःच्या पोळीवर तूप ओढण्यासाठी प्रत्येकच कसा आसुसलेला आहे याचे निदर्शक होता. अर्थात हे सगळे नैतिक, कायदेशीर चौकटीत बसणारे होते. त्यामुळे झाले ते झाले म्हणायचे अन् पुढे जायचे. प्रत्येकजण आपल्याला अधिक काय मिळेल याचा प्रयत्न करीत होता. लोकशाही व्यवस्थेचा भाग म्हणून ते अपरिहार्य होते. आता निवडणूक पुढच्या टप्प्यावर गेली असल्यामुळे मुद्दा येतो आहे तो खुळखुळणारा पैसा नियंत्रणात ठेवता येईल का हा?*

# पोहीच्या जलकुंभाला चार महिन्यातच गळती, ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अचलपूर**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत अचलपूर तालुक्यातील पोही येथे उभारण्यात आलेल्या 'सपन' पाणी पुरवठा योजनेच्या जलकुंभाच्या बांधकामावर आता संशयाचे गडद सावट पसरले आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेल्या या जलकुंभाला केवळ तीन ते चार महिन्यांतच गळती लागल्याने कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात आली. मात्र प्रत्यक्षात नव्याने उभारण्यात आलेल्या जलकुंभाची अवस्था पाहून ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जलकुंभाच्या भिंतींमधून आणि विविध भागांतून पाणी झिरपत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. एवढ्या कमी कालावधीत जलकुंभाला गळती लागणे म्हणजे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा पुरावा असल्याची चर्चा गावात सुरू आहे.



ग्रामस्थांच्या मते, काम करताना दर्जाहीन साहित्याचा वापर करण्यात आला का, गुणवत्ता नियंत्रणाची प्रक्रिया केवळ कागदोपत्रीच राहिली का, तसेच संबंधित यंत्रणेने बांधकामाची योग्य तपासणी केली होती का, असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. शासनाचा निधी खर्च करून उभारलेल्या सार्वजनिक प्रकल्पांची अशी दुरवस्था होत असेल तर जनतेच्या पैशाचा नेमका हिशोब कोण देणार, असा सवालही नागरिकांकडून केला जात आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे जलकुंभावरील शिडीची अवस्था. शिडी तारांनी बांधून ठेवण्यात आली असून तिला तात्पुरत्या स्वरूपात पाचर्यांचा आधार देण्यात आल्याचे दिसून येत आहे. ही शिडी अत्यंत डळमळीत असल्याने जलकुंभावर चढ-उतार करणार्या कर्मचार्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. सार्वजनिक सुविधांच्या कामांमध्ये असा हलगर्जीपणा कसा काय खपवून घेतला गेला, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. पोहीतील जलकुंभ प्रकरणात प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी आणि दोषींवर कारवाई करून शासनाच्या निधीचा हिशोब द्यावा, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# वरुड तालुका गारपीटग्रस्त घोषित करा

## शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाखांची मदत द्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३वरुड** तालुक्यात ३० व ३१ मे रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर किसान न्याय हक्क संघर्ष समिती आणि तालुक्यातील शेतकऱ्यांनी मंगळवारी तहसीलदार

### तहसीलदारांच्या कक्षात शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

कार्यालयात ठिय्या आंदोलन करत वरूड तालुका गारपीटग्रस्त घोषित करण्याची तसेच शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

यंदा एप्रिल आणि मे महिन्यात तापमान ४५ ते ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने संत्रा व मोसंबी बागांमध्ये मोठ्याप्रमाणात फळगळ झाली होती. त्यानंतर अवकाळी पाऊस वा गारपिटीचा फटका बसल्याने उर्वरित फळांचेही मोठे नुकसान झाले. परिणामी शेतकऱ्यांच्या हाती उत्पादनच उरले नसल्याची व्यथा आंदोलनकर्त्यांनी मांडली.या आंदोलनात कृषी उत्पन्न बाजारसमितीचे सभापती नरेंद्र (बबलू) पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, माजी संचालक सुधाकरराव दोड, संचालक गणेश खरडे, माजी नगरसेवक धनंजय बोकडे, किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे स्वप्नील खांडेकर, राजेश डवरे, देवेंद्र शेडके, चंद्रकांत बोडनासे, हिराकांत उईके, मनीष धोटे, अकुश बोडनासे यांच्या सह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# वरूड मोर्शी तालुक्यात पांदण रस्त्यांच्या कामामध्ये कोट्यवधींचा घोटाळा !

## तालुक्यातील मातोश्री पाणंद रस्ते कामांवर गंभीर प्रश्नचिन्ह !

### हजारो नागरिकांच्या नावावर बोगस मस्टर, चौकशीच्या मागणीला प्रशासनाकडून केराची टोपली !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ मोर्शी-** वरूड आणि मोर्शी तालुक्यात मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या मातोश्री पाणंद रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असून कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून हजारो नागरिकांच्या नावावर बोगस मस्टर तयार करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या माध्यमातून लाखो रुपयांची देयके काढण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.विशेष म्हणजे, या गंभीर प्रकरणाबाबत अनेक वेळा लेखी तक्रारी करूनही संबंधित प्रशासन आणि जबाबदार अधिकाऱ्यांनी चौकशी करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.वरूड मोर्शी तालुक्यात अनेक कामांवर प्रत्यक्ष मजूर उपस्थित नसताना मस्टर रोलमध्ये नावे दाखविण्यात आली आहेत. काही ठिकाणी कामे अपूर्ण असतानाही मोठ्या प्रमाणात कुशल व अकुशल मजुरीची बिले सादर करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपहार झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, वरूड आणि मोर्शी तहसील कार्यालयामार्फत शेकडो पाणंद रस्त्यांच्या कामांची देयके मंजुरीसाठी पुढे पाठविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र चौकशी पूर्ण होण्यापूर्वी ही देयके अदा करण्यात आल्यास पुरावे नष्ट होण्याची आणि भ्रष्टाचार झाकण्याची भीती व्यक्त होत



आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मोर्शी तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी मनरेगा आयुक्त नागपुर तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची दिनांक २५ मे रोजी भेट घेऊन संपूर्ण प्रकार त्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर मनरेगा आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी उपजिल्हाधिकारी रोहयो यांना तत्काळ चौकशी करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असताना सुद्धा वरूड तहसीलदार यांनी २७ मे रोजी ८ कोटी १४ लक्ष ५९ हजार ७१६ रुपयांचे राज्य रोहयो पूरक निधी बिल उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्याकडे सादर केले असता उपजिल्हाधिकारी रोहयो यांनी कुठल्याच प्रकाराची चौकशी न करता ८ कोटी १४ लक्ष रुपयांचे बिल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांच्याकडे सादर केल्यामुळे मनरेगा आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, चौकशी पूर्ण होईपर्यंत सर्व देयके स्थगित ठेवावीत, अशी मागणी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे रुपेश वाळके यांनी केली आहे. तसेच दोषी अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# राखेच्या प्रदूषणाने मासोद येथील नागरिक हैराण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अंजनगावबारी,**

मासोद गावात गेल्या अनेक वर्षांपासून बाहेरून मोठ्या प्रमाणात आणून टाकण्यात येणाऱ्या राखेमुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः धुळीला मिळाले असून गावकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावाच्या परिसरात टाकण्यात येणारी राख वाऱ्यामुळे संपूर्ण गावात पसरते. अनेक वेळा धुळीचे प्रमाण इतके वाढते की रस्तेही दिसेनासे होतात. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अनेक लहान-मोठे अपघात घडल्याचेही नागरिकांनी सांगितले.या राखेमुळे लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. गावात राख आणणे व टाकणे तत्काळ बंद करावे तसेच यापूर्वी साठवून ठेवलेल्या राखेची योग्य विल्हेवाट लावावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, ग्रामपंचायतने ग्रामसभा व मासिक बैठकीत याबाबत ठराव मंजूर करून संबंधितांना नोटीस बजावावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कारवाई न केल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी गिरीश चौधरी, सामाजिक कार्यकर्ते राहुल पुरी, सूरज गवळी, गौरव नंदनवार, अविनाश मसराम, अक्षय कुंभरे, अनिकेत सुनकर, अभिषेक उमक, अनिकेत वैद्य, महेश केवतकर उपस्थित होते.

# आता प्रत्येकांना कचऱ्याचे घरातच करावे लागणार चार प्रकारांत वर्गीकरण

## ओला, सुका, घातक आणि स्वच्छता कचरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती** केंद्र शासनाने 'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६' लागू करून कचरा व्यवस्थापनासाठी नवे निकष निश्चित केले आहेत. या नियमांनुसार प्रत्येक कुटुंब, संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांना कचऱ्याचे चार प्रकारांत वर्गीकरण करणे बंधनकारक राहणार आहे.

ग्रामपंचायतींना या नियमांच्या अंमलबजावणीची जबाबदारी



देण्यात आली असून, उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती आणि पुनर्वापराला प्रोत्साहन देण्यावर भर राहणार आहे.प्रत्येक ग्रामपंचायतीला नियमित अहवाल सादर करावा लागणार असून, बल्क वेस्ट जनरेटरची स्वतंत्र नोंदणीही सक्तीची करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध होण्याची अपेक्षा असून गाव स्वच्छ सुंदर दिसण्यास मदत होणार आहे.केंद्र शासनाने नवीन नियमांची अधिसूचना जारी केली आहे. ग्रामीण व शहरी भागात कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन करण्यावर भर देण्यात आला आहे.ग्रामपंचायतींना अंमलबजावणीसाठी विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

### या चार प्रकारांत वर्गीकरण सक्तीचे

ओला कचरा, सुका कचरा, घरगुती घातक कचरा आणि स्वच्छता कचरा असे चार प्रकार करण्यात आले आहेत. प्रत्येक घराने स्वतंत्र डब्यांमध्ये कचरा जमा करणे आवश्यक राहणार आहे. कचरा मिश्रित स्वरूपात देण्यास मनाई राहणार आहे.

# कृषी विज्ञान केंद्राच्या 'शेती बचाव अभियाना'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## संतुलित खत वापरावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती,** कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा) व प्रकल्प संचालक आत्मा (-ढच-), अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ३० जून २०२६ या कालावधीत जिल्हा भर 'शेती बचाव अभियान' राबविण्यात येत आहे.

शेती अधिक उत्पादनक्षम, किफायत शीर व पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मिळत आहे.सध्या अभियानांतर्गत २९ हून अधिक गावांमध्ये शेतकरी मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रम, प्रात्यक्षिके आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. अनेक शेतकरी डीएपी व युरिया खतांचा अतिरेकी वापर करत असल्याने जमिनीतील अन्नद्रव्यांचे संतुलन बिघडून मातीची गुणवत्ता घसरत असल्याचे कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. के. पी. सिंह यांनी सांगितले. यावर उपाय म्हणून माती परीक्षणावर आधारित संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.अभियानादरम्यान शेतकऱ्यांना जैवखते, सेंद्रिय खतांचा वापर, मातीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे महत्त्व तसेच शास्त्रीय पद्धतीने खतांचा वापर याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. विषय विशेषज्ञ डॉ. हर्षद ठाकूर यांनी हिरवळीचे खत, जीवामृत, कंपोस्ट व शेणखता च्या वापरामुळे जमिनीची सुपीकता आणि उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होत असल्याचे सांगितले .शेतकऱ्यांमध्ये जनजागृतीसाठी माहितीपूर्ण पोस्टर्सचे वितरण करण्यात येत असून आधुनिक व पर्यावरणपूरक शेती तंत्रज्ञानाची माहिती दिली जात आहे. नांदगाव खंडेश्वर, अमरावती व भातकुली तालुक्यात सुरू असलेल्या या मोहिमेचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कृषी विज्ञान केंद्राच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान लाभत आहे.

# झेडपीला मिळाले नवीन कार्यकारी अभियंता, कॅफो

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती** - जिल्ह्याचे मिनीमंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेच्या दोन महत्त्वाच्या विभागांना नवीन विभागप्रमुख मिळाले आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिल्पा पवार यांची महापालिकेत बदली झाल्यानंतर त्यांच्या रिक्त जागी एम. जी. टेळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच दीड वर्षांपासून रिक्त असलेल्या उपमुख्य लेखा व वित्त अधिकारीपदी विकास पाटील यांची, तर बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता म्हणून नीला वंजारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी अकोला जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता नीला वंजारी यांना पदस्थापना देण्यात आली आहे. नवीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे विविध योजनांच्या अंमलबजावणीतील कामकाजाला गती मिळण्याचे संकेत आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# शहरातील सातबारा इतिहास जमा

# हद्दवाढीतील नागरिकांना मिळणार प्रॉपर्टी कार्ड

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ३ अमरावती**

नगरपालिका हद्दवाढीमुळे शहरात समाविष्ट झालेल्या गावांतील भूधारकांसाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, या भागातील जमिनींसाठी वापरले जाणारे पारंपरिक सातबारा उतारे टप्प्याटप्प्याने बंद करून नागरिकांना डिजिटल प्रॉपर्टी कार्ड देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे मालमत्ता व्यवहार, कर्जप्रकरणे आणि मालकी हक्काच्या नोंदी अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहेत.नागरी क्षेत्रातील जमिनींचा वापर प्रामुख्याने निवासी व बिगरशेती कारणांसाठी होत असल्याने अशा जमिनींची नोंद सातबाराऐवजी नगर भूमापन विभागाच्या अखत्यारीतील प्रॉपर्टी कार्डवर असणे आवश्यक ठरत आहे. महसूल व भूमिअभिलेख विभागाने हद्दवाढ क्षेत्रातील भूमापनाचे काम अंतिम टप्प्यात आणले असून, येत्या काही महिन्यांत जुन्या सातबारा उताऱ्यांच्या जागी डिजिटल प्रॉपर्टी कार्ड वाटपाची प्रक्रिया सुरू होणार आहे.या निर्णयाचा सर्वाधिक फायदा बँक कर्ज घेणाऱ्या नागरिकांना होणार आहे. अनेकदा नागरी भागातील सातबारा उताऱ्यावर बँका गृहकर्ज



किंवा व्यावसायिक कर्ज मंजूर करण्यास टाळाटाळ करीत होत्या.

मात्र, अधिकृत प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध झाल्यानंतर राष्ट्रीयीकृत व खासगी बँकांकडून कर्ज मंजुरीची प्रक्रिया अधिक जलद आणि सोपी होणार आहे.हद्दवाढ क्षेत्रातील प्रत्येक घर, प्लॉट आणि सरकारी जमिनीची अचूक सीमा निश्चित करण्यासाठी विशेष नगर भूमापन योजना राबविण्यात येत आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने संपूर्ण क्षेत्राचे सर्वेक्षण करून नगर भूमापन रजिस्टरमध्ये नोंद करण्यात येणार आहे. त्यामुळे मालमत्तेच्या हद्दीबाबतचे वादही कमी होण्यास मदत होईल.प्रॉपर्टी कार्डमध्ये मालमत्तेचे अचूक क्षेत्रफळ, मालक व भोगवटादारांची माहिती, हिश्श्याची नोंद तसेच कर्ज किंवा अन्य बोजांची माहिती स्पष्टपणे नमूद केली जाणार आहे. न्यायालयीन व शासकीय कामकाजातही हा दस्तऐवज अधिक विश्वासार्ह मानला जातो.

### संपूर्ण क्षेत्राची भूमापन विभागात होणार नोंद

हद्दवाढ क्षेत्रात आतापर्यंत कृषी जमिनीप्रमाणे 'सातबारा' आणि '८-अ'चा उतारा दिला जात होता. मात्र, आता हा सातबारा इतिहासजमा होणार आहे. महसूल विभागाकडून या भागातील चालू सातबारा उतारे अधिकृतपणे बंद केले जातील आणि संपूर्ण क्षेत्राची नोंद नगर भूमापन रजिस्टरमध्ये केली जाईल.

## बालवयात शाळेची गोडी लागणार;

# जि.प. शाळांमध्ये भरणार अंगणवाडी वर्ग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ अमरावती–** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ-२०२०) अंतर्गत राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये अंगणवाडीचे वर्ग सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षण विभागाने यासंदर्भात सर्व जिल्हा परिषदांना आवश्यक सूचना दिल्या असून हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे.या निर्णयानुसार जिल्हा परिषद शाळांमधील रिकाम्या आणि सुस्थितीतील वर्गखोल्यांचा वापर अंगणवाड्यांसाठी केला जाणार आहे. त्यामुळे बालकांना लहान वयातच शालेय वातावरणाची ओळख होईल. शिक्षणाची भीती कमी होऊन पुढील शालेय जीवनासाठी त्यांची मानसिक तयारी अधिक चांगली होण्यास मदत मिळेल.सध्या जिल्ह्यातील अनेक अंगणवाड्या भाड्याच्या जागा, समाजमंदिर किंवा ग्रामपंचायत इमारतींमध्ये सुरू आहेत. अशा ठिकाणी जागेची व मूलभूत सुविधांची कमतरता जाणवते. नवीन उपक्रमामुळे अंगणवाडीतील बालकांना सुरक्षित, स्वच्छ आणि शैक्षणिक




वातावरण मिळणार आहे. तसेच शाळांमधील उपलब्ध साधनसामग्रीचा प्रभावी वापर होणार आहे.शैक्षणिक तज्ज्ञांच्या मते, अंगणवाडी आणि शाळा यांच्यातील दुवा मजबूत झाल्यास बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. यामुळे जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थीसंख्या वाढण्यासही मदत होऊ शकते.प्रशासनाने सुरुवातीला मूलभूत सुविधा उपलब्ध असलेल्या आणि रिकाम्या वर्गखोल्या असलेल्या शाळांची निवड करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. पुढील काळात हा उपक्रम सर्व जिल्हा परिषद शाळांपर्यंत विस्तारण्याचे नियोजन आहे.

# चार महिलांचे बळी घेणारी ती वाघीण मेळघाटात नकोच

## आ. केवलराम काळे यांची टी. टी. सेंटरला भेट




**विदर्भ प्रजासत्ताक दि.३परतवाडा** :चंद्रपुर जिल्ह्यात चार महिलांचा बळी घेणाऱ्या वाघीणीला परतवाडा येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरमध्ये उपचार केंद्रात आणण्यात आले आहे. या वाघिणीला भविष्यात मेळघाटातील अतिसंरक्षीत क्षेत्रात सोडण्यासाठी वन्यजीव विभाग तयारीत असल्याची माहिती आहे. मात्र याला आ. केवलराम काळे यांचा विरोध असून याबाबत त्यांनी परतवाडा येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे भेट देऊन वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. मेळघाटात या वाघिणीला सोडण्यात येऊ नये, अशी मागणी त्यांनी अधिकाऱ्यांकडे केली आहे.यापूर्वी मेळघाटात बिबटयाने अनेक निष्पाप लोकांचा बळी घेतला आहे. त्यात चंद्रपुरची वाघिण सोडल्यास हा संघर्ष वाढेल, अशी भीती व्यक्त करत केवलराम काळे यांनी त्या वाघिणीला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडण्यास विरोध दर्शविला. चार महिलांचा बळी घेणाऱ्या वाघिणीचे ४ बछडे असुन त्यातील २ बछड्यांचा वन्यजीव विभागाने शोध घेत चंद्रपूर येथीलवनकुटीत एक बछडे तर दुसरे बछडे नागपुर येथील गोरेगांव येथे ठेवले आहे. परतवाडा येथे असणाऱ्या या वाघीणीस ज्ञानगंगा वन्यजीव भागात व नागपूर गोरेवाडा येथे सोडण्यात यावे. जेणेकरुन या बछड्यांचा सहवास वाघिणीला मिळू शकेल, अशी सूचना यावेळी आ. केवलराम काळे यांनी केली. याप्रसंगी यशवंत काळे, शैलेश म्हाला, वन्यजीव अभ्यासक अल्केश ठाकरे, स्वीय सहाय्यक आकाश खैरकर उपस्थित होते.

# नावापुरते ॲडमिशन नाही चालणार; कॉलेजात बायोमेट्रिक हजेरी लागणार

## कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती सक्तीची: कमी हजेरी असल्यास येणार अडचणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ अमरावती**

राज्यातील अनेक कनिष्ठ महाविद्यालये आणि खासगी कोचिंग क्लासेस यांच्यातील वाढत्या समन्वयामुळे शिक्षण विभागाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थी केवळ बारावीच्या परीक्षेसाठी महाविद्यालयात प्रवेश घेतात, मात्र नियमित अध्यापनासाठी कोचिंग क्लासेसवर अवलंबून राहतात. परिणामी महाविद्यालयांतील उपस्थिती आणि शैक्षणिक शिस्तीचा प्रश्न निर्माण झाला आहे.



या पार्श्वभूमीवर कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्याची तयारी सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविली जाणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला किमान ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य राहणार आहे. हजेरीची अट पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेस बसण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती वाढण्यास मदत होणार आहे. तसेच, शिक्षण विभागाला उपस्थितीची माहिती तत्काळ उपलब्ध होणार आहे. शिक्षणातील गुणवत्ता आणि शिस्त वाढविण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.काही विद्यार्थी केवळ बारावीच्या बोर्ड परीक्षेसाठी प्रवेश घेतात. महाविद्यालयात नियमित हजेरी लावली जात नसल्याची स्थिती आहे. शैक्षणिक प्रक्रियेत महाविद्यालयांची भूमिका मर्यादित होत असल्याचे दिसते. त्यामुळे आता शासनाने हजेरी घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे काही पालकांनी स्वागत केले.

### आता कनिष्ठ महाविद्यालयांत बायोमेट्रिक हजेरी

विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक यंत्राद्वारे नोंदविली जाणार आहे. हजेरीची माहिती डिजिटल स्वरूपात जतन केली जाणार आहे. यामुळे बनावट किंवा चुकीच्या उपस्थितीला आळा बसणार आहे.

### विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी किमान ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य राहणार आहे. नियमित वर्गांना उपस्थित राहण्यावर भर दिला जाणार आहे. कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांवर कारवाईची शक्यता आहे.

# चांदूर बाजारात १३.७८ लाखांचा अवैध गुटखा जप्त

## एक आरोपी अटकेत, अनेकांवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३चांदुर बाजार**

अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवैध गुटखा वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत चांदूर बाजार येथे १३ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून इतर फरार आरोपींचा शोध सुरू आहे.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध गुटखा विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत २ जून रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस



उपनिरीक्षक नितीन इंगोले यांच्या पथकाने चांदूर बाजार पोलिसांच्या मदतीने अमरावती रोडवरील रेल्वे फाटकाजवळ सापळा रचला.

संशयित बोलेरो पिकअप वाहन (एमएच-४८ सीबी-३२४७) थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन भरधाव वेगाने पळवून नेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून वाहन अडविले. यावेळी चालक व क्लिनर पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना क्लिनर शोएब अली अशफाक अली (वय २४) याला पकडण्यात यश आले.वाहनाची पंचांसमक्ष तपासणी केली असता २० मोठ्या पोत्यांमध्ये 'हॉट' पान मसाला व सुगंधित तंबाखूची पाकिटे आढळून आली. या मालाची किंमत ८ लाख ५८ हजार रुपये असल्याचे निष्पन्न झाले. अन्न सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून माल जप्त करण्यात आला.या कारवाईत प्रतिबंधित गुटखा व तंबाखूसह बोलेरो वाहन, दोन मोबाईल फोन असा एकूण १३ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शोएब अली अशफाक अली, वाहन चालक सज्जू, वाहन मालक पिंटू उर्फ मोहम्मद साबीर मोहम्मद रफीक तसेच अमरावती येथील शेख अमीन शेख नाजीम, सय्यद जुनेद सय्यद जब्बार, विकी मंगलानी आणि आसीफ अशर्फी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता व अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे व चांदूर बाजार पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहेत.

# सीआरएस प्रणालीमुळे जुन्या जन्म-मृत्यू नोंदींना मर्यादा

## नागरिकांनी सहकार्य करावे - डॉ. विशाल काळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ अमरावती–**

अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जन्म व मृत्यू नोंदी तसेच दाखले महानगरपालिकेमार्फत केंद्र सरकारच्या सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टीम (सीआरएस) सॉफ्टवेअरद्वारे दिले जात आहेत. शासनाच्या धोरणानुसार जुन्या नोंदींची नोंदणी करण्यासाठी दरमहा २,००० नोंदींची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे जुने दाखले उपलब्ध




असलेल्या नागरिकांच्या नोंदी नवीन सॉफ्टवेअरमध्ये समाविष्ट करताना ही मर्यादा लागू होत आहे. संबंधित सर्व कागदपत्रांची पडताळणी करूनच नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी सांगितले. नियमित नवीन जन्म-मृत्यू नोंदींवर या प्रक्रियेचा कोणताही परिणाम होणार नसून, सीआरएस पोर्टलवर आधीच नोंदणी झालेल्या नागरिकांना अडचण येणार नाही. नागरिकांनी जन्म-मृत्यू विभागातील कर्मचाऱ्यांशी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. काळे यांनी केले आहे.

# चांदूर रेल्वेत विजेचा लपंडाव; नागरिकांचा संताप अनावर

## रात्रीपासून सकाळपर्यंत अंधार, रामनगरवासीयांनी सोसल्या हालअपेष्टा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३चांदूर रेल्वे–** चांदूर रेल्वे शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या विजेच्या लपंडावामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

सोमवारी रात्री उशिरापर्यंत वीज ये-जा सुरूच होती. नागरिकांच्या म्हणण्यानुसार रात्री सुमारे १२ वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरळीत नव्हता. त्यानंतर सोमवार-मंगळवारच्या मध्यरात्री रामनगर परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला. रात्री २ ते ३ वाजताच्या दरम्यान गेलेली वीज मंगळवारी सकाळी सुमारे १०.१५ वाजता सुरू झाली. त्यामुळे रामनगरमधील नागरिकांना तब्बल ७ ते ८ तास अंधारात रात्र काढावी लागली. विशेष म्हणजे, सकाळी वीजपुरवठा सुरू झाल्यानंतरही नागरिकांची सुटका




झाली नाही.

मंगळवारी सायंकाळी पुन्हा काही वेळ शहरातील वीजपुरवठा खंडित झाल्याने संतप्त नागरिकांनी महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नागरिकांच्या मते, सध्या शहरात विजेचा पुरवठा केव्हा येईल आणि केव्हा जाईल याचा कोणताही नेम उरलेला नाही. वारंवारच्या या समस्येमुळे व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. वारंवारच्या वीजखंडितामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी महावितरणने तात्काळ सुधारणा करावी, अन्यथा तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही दिला आहे.

### आमदार महोदय देणार का लक्ष ?

चांदूर रेल्वे शहरात सुरू असलेल्या वारंवारच्या विजेच्या लपंडावामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर स्थानिक आमदारांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेऊन योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तसेच नागरिकांच्या म्हणण्यानुसार, चांदूर रेल्वे येथील ६६ केव्ही सबस्टेशनचे ३३ केव्हीमध्ये रूपांतर करण्यात आल्यापासून वीजपुरवठ्याच्या समस्या वाढल्या आहेत. नियमानुसार या केंद्राची क्षमता वाढवून १३२ केव्हीपर्यंत नेणे अपेक्षित असताना उलट क्षमता कमी करण्यात आल्याचा आरोप नागरिक करत आहेत. परिणामी चांदूर रेल्वेला धामणगावच्या यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत असल्याचे बोलले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून चांदूर रेल्वेच्या वीज समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी शहरवासीयांकडून जोर धरत आहे.

# यवतमाळ विधानपरिषद निवडणुकीआधीच मविआच्या उमेदवाराची माघार

## संख्याबळ जुळत नसल्याचे कारण, काँग्रेस तोंडघशी पडली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३यवतमाळ** : राज्याच्या राजकीय वर्तुळात अत्यंत मोठी आणि धक्कादायक घटना आज बुधवारी यवतमाळ येथे घडली. यवतमाळ विधानपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत महाविकास आघाडीला (मविआ) मोठा राजकीय फटका बसला असून, आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी अचानक आपली उमेदवारी मागे घेतली आहे. विजयासाठी आवश्यक असणारे संख्याबळ कागदावर जुळत नसल्याने श्रहा निर्णय घ्यावा लागल्याचे स्वतः कांबळे यांनी स्पष्ट केले आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर उमेदवारानेच माघार घेतल्यामुळे स्थानिक पातळीवर मविआच्या



रणनीतीचे पार धिंडवडे निघाले असून दोन दिवसांपूर्वी विजयाचा निर्धार करणारे आघाडीचे नेते तोंडघशी पडले आहेत.

निवडणूक जिंकण्यासाठी केवळ तोंडी किंवा लेखी बोलून चालत नाही, तर त्यासाठी 'साम, दाम, दंड, भेद' आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पुरेसे 'संख्याबळ' लागते, जे

### पुरेसे संख्याबळ नसल्याचे कारण

साहेबराव कांबळे यांनी येथील जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना, 'काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी माझ्यासारख्या एका मागासवर्गीय कार्यकर्त्यावर विश्वास ठेवून काँग्रेस पक्षाची उमेदवारी जाहीर केली होती. एका मागासवर्गीय माणसाला विधानपरिषदेचे तिकीट मिळणे ही माझ्यासाठी आणि समाजासाठी अत्यंत अभिमानाची बाब होती. परंतु, प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला असता, महाविकास आघाडीकडे विजयासाठी आवश्यक असणारे संख्याबळ पुरेसे नाही.

आमच्याकडे नाही', त्यामुळे माघार घेत असल्याचे जाहीर केले. मात्र कांबळे यांच्या माघारीमागे मोठे राजकीय नाट्य असल्याची चर्चा आहे. कांबळे यापूर्वी शासकीय सेवेत होते. तेथील काही धागेदोरे पकडून त्यांना कारवाईच्या कचाट्यात आणण्याची भीती रणनीती सत्ताधारी पक्षाने दाखविण्याची चर्चा आहे. लवकरच साहेबराव कांबळे यांचा शिवसेना पक्ष प्रवेश असल्याचेही सांगितले जात आहे.

# उड्डाणपुलाच्या डिझाईनला रेल्वेची मंजुरी

## आठवडाभरात अंतिम आराखडा तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती मॉडेल रेल्वेस्थानक ते राजकमल चौक दरम्यान प्रस्तावित नव्या उड्डाणपुलाच्या संकल्पचित्राला (डिझाईन) रेल्वे विभागाने अखेर हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला असला, तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आराखड्यात काही किरकोळ त्रुटी आढळून आल्याने अंतिम आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे.राजकमल चौक ते रेल्वे स्थानकादरम्यानचा विद्यमान रेल्वे उड्डाणपूल जीर्ण झाल्यामुळे ऑगस्ट २०२५ पासून वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नव्या उड्डाणपुलाच्या उभारणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेल्या आराखड्याला प्राथमिक मंजुरी



दिल्यानंतर तो रेल्वे विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. रेल्वे प्रशासनाने दोन दिवसांपूर्वी या संकल्पचित्राला मान्यता दिली. मात्र, पुलाच्या उतरणीच्या मार्गांशी संबंधित काही तांत्रिक बाबींमध्ये सुधारणा आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.मंगळवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी रेल्वे स्थानक चौक, राजकमल चौक, रायली प्लॉट आणि हमालपुरा परिसरातील प्रस्तावित मार्गांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी आराखड्यातील किरकोळ त्रुटी दुरुस्त करून आठवडाभरात परिपूर्ण आणि अंतिम आराखडा सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीमुळे सध्या आचारसंहिता लागू असल्याने प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला तात्पुरता विलंब झाला आहे. आचारसंहिता समाप्त होताच निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती बांधकाम विभागातील सूत्रांनी दिली.या प्रकल्पाचे संपूर्ण बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. रेल्वे विभागाची मंजुरी मिळाल्याने प्रकल्पाला गती मिळणार असून, अंतिम आराखडा तयार झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासोबतच रेल्वे स्थानक परिसरातील संपर्क अधिक सुलभ करण्यासाठी हा उड्डाणपूल महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.-

# NEET पेपर लीक प्रकरणावर अमरावतीत विद्यार्थ्यांचा संताप

**५ जूनला NSUI चा भव्य मशाल मोर्चा**

## शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी, NTA बरखास्त करण्याचा नारा

### विद्यार्थी, पालक आणि सामाजिक संघटनांचा सहभाग अपेक्षित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती –**

देशभरात गाजत असलेल्या छएएढ पेपर लीक घोटाळ्याच्या निषेधार्थ अमरावतीत ५ जून रोजी भव्य मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या या गंभीर प्रकरणा विरोधात नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया अर्थात छडणख आक्रमक झाली असून देशभर आंदोलनांची मालिका सुरू आहे.छडणख चे राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखर यांच्या नेतृत्वा खाली, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे, प्रदेश उपाध्यक्ष




संकेत कुलट आणि अमरावती जिल्हाध्यक्ष सर्वेश खांडे यांच्या पुढाकाराने हा मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे.हा मोर्चा शुक्रवार, ५ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजून ३० मिनिटांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अर्थात इर्विन चौक येथून सुरू होऊन जयस्तंभ चौकातील महात्मा गांधी पुतळ्यापर्यंत जाणार आहे.या आंदोलनातून केंद्र सरकारच्या निष्काळजीपणा विरोधात तीव्र निषेध नोंदवला जाणार असून विद्यार्थी, युवक, पालक आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे.या आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी आणि छढ- बरखास्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या मशाल मोर्चाबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी छडणख चे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.छएएढ पेपर लीक प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, अमरावतीती ल हा मशाल मोर्चा किती मोठा प्रतिसाद मिळवतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# बंडखोर बाजोरिया यांचे सूचक शिंदे,उबाठा, सपाचे नगरसेवक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती**

अमरावती विधान परिषद निवडणुकीत मोठी राजकीय खळबळ उडवणारे अपक्ष उमेदवार तथा बंडखोर उमेदवार विप्लव बाजोरिया यांचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी रद्द केलेल्या नामांकन अर्जावर सूचक म्हणून ज्या नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत त्या नेमक्या कोणाच्या, हा उत्सुकतेचा विषय ठरला होता.छाननी दरम्यान ते सुचक शिवसेना व (शिंदे), शिवसेना (उबाठा) व समाजवादी पक्षाचे असल्याचे दिसून आले. पक्षासोबत गद्दारी करणाऱ्या नगरसेवकांवर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. बाजोरिया यांचे सूचक संपूर्ण नगरसेवक हे अंजनगाव



सुर्जी येथील व त्यापैकी सर्वाधिक पाच नगरसेवक शिवसेनेचे (उबाठा) होते. त्यामुळे आता आमदार लवटे यांच्या भूमिकेवरही लक्ष केंद्रीत झालेले आहे.

विधान परिषद निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी विप्लव बाजोरिया यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. बाजोरिया यांनी नामांकन दाखल केले तेव्हा युवा स्वाभिमानचे काही कार्यकर्ते सोबत होते. त्यामुळे त्यांच्या अर्जावर युवा स्वाभिमान पक्षाच्या नगरसेवकांच्या सह्या असतील, असे बोलले जात होते. एक-दोन नव्हे तर तब्बल १० नगरसेवकांच्या सूचक म्हणून सह्या अपेक्षित असल्याने ते १० नगरसेवक कोण, याची उत्सुकता होती.महायुतीने अधिकृत उमेदवार दिलेला असतानाही शिवसेनेचे (शिंदे) समर्थक बाजोरिया यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून राजकीय वर्तुळात चर्चे ला तोंड फोडले होते. विशेष म्हणजे, नामांकन अर्ज दाखल करण्याच्या अंतिम मुदतीच्या अवघ्या अर्धा तास आधी त्यांनी अर्ज सादर केला होता. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा देणारे दहा स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य नेमके कोण असतील, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. दरम्यान, बाजोरिया यांच्या अर्जावरील सूचक आणि अनुमोदकांमध्ये शिवसेना (शिंदे), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तसेच समाजवादी पक्षाशी संबंधित नगरसेवकांच्या सह्या असल्याचे समोर आले. अंजनगाव नगर परिषदेतील काही नगरसेवकांनी बाजोरिया यांना पाठिंबा दिल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या निवडणुकीत वेगळी राजकीय समीकरणे तयार होत असल्याची चर्चा सुरू झाली होती.

### ते नगरसेवक कोण?

त्या नगरसेवकांमध्ये अंजनगाव सुर्जी नगरपालिकेतील पुनम येऊत, प्रियांका अंबडकर, रामण्य आंबेडकर शिवसेना (शिंदे), रूपाली देवगिरे, सीमा विजयकर, मो. रेहान अब्दुल उमुनाफ, श्रीकांत जुनघरे, सुनीता काळे शिवसेना (उबाठा), अबिदाबी मो. आरीफ, इब्राहिम बेग हसन बेग समाजवादी पक्षाच्या नगरसेवकांचा समावेश आहे. अंजनगावसुर्जी मध्ये उद्धव ठाकरे गटाचे आमदार गजानन लवटे आहेत. महाविकास आघाडी म्हणून काँग्रेसचे उमेदवार हर्षल देशमुख यांना नगरसेवकांनी पाठिंबा द्यायला हवा. मात्र त्यांनी बंडखोर उमेदवाराच्या अर्जावर सूचक म्हणून सह्या दिल्यामुळे आता काय कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खरीप हंगामापूर्वी बियाणे-खते उपलब्ध करा

## ट्रॅक्टरधारकांना कॅनमध्ये डिझेल द्या

**युवा स्वाभिमानचे निवेदन**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती** आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर भातकुली व अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बी-बियाणे, रासायनिक खते आणि कृषी यंत्रसामग्रीसाठी आवश्यक डिझेल उपलब्ध करून देण्याची मागणी युवा स्वाभिमान पार्टीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.७ जूनपासून खरीप हंगामास प्रारंभ होत असून शेतकरी सध्या नांगरणी, वखरणी, बांधबंदिस्ती व इतर पेरणीपूर्व कामांमध्ये व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत विविध प्रकारच्या सोयाबीन व कापूस बियाण्यांसह डीएपी, युरिया, १०-२६-२६ या सारख्या रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता असल्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. काही विक्रेत्यांकडून कृत्रिम टंचाई निर्माण करून जादा दराने विक्री



केली जाऊ शकते, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.युवा स्वाभिमान पार्टीने कृषी विभागामार्फत सर्व कृषी सेवा केंद्रांवर पुरेशा प्रमाणात दर्जेदार बियाणे व खते उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच काळाबाजार, साठेबाजी आणि शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी विशेष तपासणी पथके नियुक्त करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, शेती मशागतीची कामे वेगाने सुरू असल्याने ट्रॅक्टर, जेसीबी व अन्य कृषी यंत्रसामग्रीसाठी डिझेलची गरज वाढली आहे. मात्र अनेक पेट्रोल पंपांवर डपकी कॅनमध्ये डिझेल देण्यास नकार दिला जात असल्याने शेतकऱ्यांना अडचणीं चा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागातील शेतजमिनी पेट्रोल पंपांपासून दूर असल्याने कृषी कामांसाठी डपकी कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभाग व पेट्रोल पंप चालकांना निर्देश देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी भातकुली तालुकाप्रमुख मंगेश झंोले, अमरावती तालुकाप्रमुख अजय घुले, देवानंद राठोड, उद्धवराव कराळे, संतोष मोटघरे, मिलिंद अवघड, श्रीकृष्ण बैलमारे, भूषण वाने, नीरज गवई, विजय मेश्राम, माणिक मंदावणे आदी उपस्थित होते.


# २४० रुपयांत गणवेश कसा शिवायचा?

## निधी कपातीमुळे शाळांसमोर मोठे संकट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना शासनाने मोफत शालेय गणवेशासाठी दिल्या जाणाऱ्या निधीत २० टक्के कपात केल्याने मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. यापूर्वी प्रति गणवेश ३०० रुपये निधी दिला जात होता. मात्र यंदा तो कमी करून २४० रुपये करण्यात आल्याने शाळांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.राज्यात सुमारे २८.७७ लाख विद्यार्थी मोफत गणवेश योजनेसाठी पात्र आहेत. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासाठी ९३ कोटी ५२ लाख ८५ हजार ४० रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

अमरावती जिल्ह्यातील १४ पंचायत समित्यांतील १,०१,३३१ लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी प्रति गणवेश २४० रुपये या दराने २ कोटी ४३ लाख १९ हजार ४४० रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.शिक्षक संघटना आणि मुख्याध्यापकांनी या निर्णयावर



तीव्र आक्षेप घेतला आहे. बाजारात कापड, दोरा आणि शिलाईचे दर मोठ्या प्रमाणात वाढले असताना २४० रुपयांत दर्जेदार गणवेश उपलब्ध करणे अशक्य असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. १५ जूनपासून शाळा सुरू होत असताना 'पीएफएमएस' प्रणालीद्वारे केवळ एकाच गणवेशाचा निधी मिळाल्याने खरेदी आणि शिलाईची प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे कठीण झाले आहे.याशिवाय गणवेश खरेदीचे निकष बदलून स्थानिक महिला बचत गटांकडून गणवेश शिवून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र अनेक ठिकाणी असे बचत गट उपलब्ध नसल्याने शाळांची आणखी कोंडी झाली आहे. समित्यांना आगाऊ निधी देण्याची तरतूद नसल्याने कापड खरेदी करणेही अडचणीचे ठरत आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी शासनाने तातडीने निधी वाढवून निकषांमध्ये सुसूत्रता आणावी, अन्यथा शाळा सुरू झाल्यानंतरही विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश मिळणे कठीण होईल, असा इशारा दिला आहे.

# सलोना येथे प्रहार-शिवसेना कार्यकर्ता मेळावा उत्साहात

## बच्चू कडू यांचे संघटन बळकटीचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३चिखलदरा**

चिखलदरा तालुक्यातील सलोना येथे प्रहार-शिवसेनेचा कार्यकर्ता मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिवसेना आमदार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत संघटना अधिक सक्षम करण्यासाठी गावागावात सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले.

तसेच जनतेच्या विविध प्रश्नांसाठी संघर्ष करण्याची



भूमिका कायम ठेवत तळागाळातील नागरिकांपर्यंत पक्षाचे विचार आणि धोरणे पोहोचविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

मेळाव्यात स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. या मेळाव्यामुळे परिसरातील पक्ष संघटनात्मक बांधणीला नवसंजीवनी मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.